बीड ■ वर्ष ३ ■ अंक ४ ■ गुरुवार, दि.१६ मे २०२४ ■ पोस्टल दिनांक १७ मे २०२४ ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ पाने ४ ■ किंमत २ रु.
Beed ■ Year-3 ■ Issue-4 ■ Thursday 16 May 2024 ■ Postal Date 17 May 2024 ■ RNI : MAHMAR/2021/80738 ■ Postal No. LSB/Beed/RNP-211/2024-2026 ■ Pages 4 ■ Price 2

# जिल्ह्यातील मतदानाचा वाढलेला टक्का पंकजा मुंडे यांच्या पथ्यावर पडणार!

## मुंडे बहिण-भाऊ शेवटच्या दिवसात वातावरण पलटवण्यात यशस्वी

सायं.दैनिक
आवाज जनसामान्यांचा..
बीड किसान
• संपादक : शेख कामरान •

### राज्यातला वंजारी समाज एकवटला..

या निवडणुकीमध्ये ओबीसी-मराठा असे म्हणण्यापेक्षा वंजारी-मराठा असा वाद मोठ्या प्रमाणात उफाळून आला. या वादामुळे जिल्ह्यातील सहा लाख मराठे एक झाले असल्याचे चित्र उभा राहिले ज्यामुळे वंजारी समाज विचारात पडला. सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून वंजारी समाजाने या निवडणुकीकडे अत्यंत गंभीर्याने बघितले. जर पंकजा मुंडे यांचा पराभव झाला तर आपले राजकीय प्रतिनिधित्व अत्यंत खाली जाईल, संसदेत आपले प्रतिनिधित्व करणारं कोणी असणार नाही ही भावना त्यांच्यामध्ये तयार झाली. त्यामुळे या मुद्द्यावर अख्या राज्यातला वंजारी समाज एकवटला असल्याचे दिसून आले. अनेक जण यासाठी जिल्ह्याच्या बाहेरून बीडमध्ये येऊन ठाण मांडून बसले होते. याशिवाय प्रीतम मुंडे यांनी बाहेरच्या वंजारी समाजाचे मेळावे घेत आपली भूमिका पटवून दिली यामुळे वंजारी समाजात मोठी जागृती निर्माण झाली आणि जिल्ह्यातील इतरत्र पसरलेला मतदार वंजारी समाज मतदानाच्या दिवशी एकत्र आला आणि मतदानाचा टक्का वाढला. या वाढत्या टक्क्यामुळे पंकजा मुंडे यांना चांगलीच लीड मिळणार असून त्यांचा विजय निश्चित मानला जात आहे.

### एक गठ्ठा मराठा मताला सुरुंग लागला..?

निवडणुकीच्या सुरुवातीच्या काळामध्ये मराठा वंजारी हा वाद चांगला पेटला. यंदा मराठा हे एक गठ्ठा बजरंग सोनवणे यांना मतदान करतील असे गृहीत धरले गेले. तसे वातावरणही तयार झाले होते. मात्र शेवटच्या टप्प्यामध्ये याला वेगळे वळण मिळाले. पंकजा मुंडे यांनी सर्व समाजाला साथ घालीत आपण तुमचीच असल्याचे जाहीर केले याशिवाय त्या नगर येथे सुजय विखे पाटील यांच्या प्रचारासाठी गेल्या आणि आपण एका मराठा उमेदवाराच्या प्रचाराला आलो असल्याचे जाहीरपणे सांगितले. त्यांच्या या भूमिकेची बरीच चर्चा झाली. सोबतच उदयनराजे छत्रपती यांनी सभा घेत माझी बहीण पंकजा मुंडे यांना कोणत्याही परिस्थितीत निवडून द्या अशी साद मराठा बांधवांना घातली. यावेळी ते भावनिक सुद्धा झाल्याचे दिसून आले. ८० टक्के मराठा समाज बजरंग सोनवणे यांच्या पाठीशी उभा राहिला तर २० टक्के मराठा मतदारांनी पंकजा मुंडे यांना पसंती दिली. अजित पवार यांनीही पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी सर्वांना मतदान देण्याचे आवाहन केले सोबतच त्यांनी बजरंग सोनवणे यांना धमकी वजा असा इशाराही दिला. या सगळ्याचा परिणाम म्हणून शेवटच्या दोन-तीन दिवसात वातावरण बदलले आणि पंकजा मुंडे यांना याचा फायदा झाला असेल मानले जात आहे.

**बीड | विशेष प्रतिनिधी**

बीड लोकसभेसाठी अटीतटीची लढत झाली. आता चार जून रोजी निकाल लागणार असून यात कोण बाजी मारणार याची चर्चा सुरू आहे. एकंदर परिस्थिती पाहता पंकजा मुंडे यांना मतदानच्या वाढलेल्या टक्केवारीचा फायदा होणार असल्याचे बोलले जात आहे. वाढलेला टक्का त्यांच्या पथ्यावर पडणार असून, शेवटच्या टप्प्यात जनतेने त्यांच्या विकासाच्या दृष्टिकोनाला साथ दिली असल्याची चर्चा होत आहे. दि.१३ मे रोजी बीड लोकसभेसाठी मतदान पार पडले. यामध्ये विक्रमी असे ७० टक्के मतदान झाल्याचे निदर्शनास आले. यामुळे आता निकाल काय लागतो याकडे लक्ष लागले आहे. यंदाच्या या निवडणुकीने बीड जिल्ह्यासह राज्याचे लक्ष वेधून घेतले. मराठा -ओबीसी असा प्रत्यक्ष संघर्ष या निवडणुकीत दिसला. » पान २ वर

### बीडमध्ये मतदान कमी झाल्याचा फायदा..

बीड लोकसभेमध्ये सर्वाधिक कमी मतदान हे बीड विधानसभेतून झाले. या ठिकाणी शरद पवार यांच्या गटाचे आमदार असलेले संदीप क्षीरसागर हे मतदारांना बाहेर काढण्यात कमी पडल्याचे बोलले जात आहे. याशिवाय जे मतदान तुतारी म्हणजे बजरंग बप्पा सोनवणे यांना पडणार होते तो मुस्लिम समाज कमी संख्येने मतदानाला आला शिवाय दलित मतदारही पाहिजे तेवढ्या संख्येने बाहेर न आलेले मतदान कमी झाले यामुळे पंकजा मुंडे यांना याच ठिकाणी फायदा होऊ शकतो असे मानले जात आहे.

### नेत्यांच्या सभांनी वातावरण बदलले..

पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी स्वतः प्रधानमंत्री राष्ट्रीय नेते नरेंद्र मोदी यांची प्रचार सभा झाली. सोबतच शेवटच्या टप्प्यामध्ये छत्रपती उदयनराजे भोसले, अजित पवार, नितीन गडकरी अशा दिग्गज नेत्यांच्या सभा पार पडल्या. नेत्यांच्या या प्रचार सभेने अखेर वातावरण ढवळून निघाले आणि पंकजा मुंडे यांच्या बाजूने वातावरण तयार झाले. त्यामुळे शेवटच्या टप्प्यात झालेल्या या वातावरणाचा फायदा निश्चितपणे पंकजा मुंडे यांनाच मिळणार असल्याचे मानले जात आहे.

### समाजाची एकी अन् लोकांची विकासाला साथ..



### आष्टीतून अधिक लीड मिळण्याची शक्यता..

बीड लोकसभे मधून आष्टी विधानसभेचे सर्वाधिक मतदान झाल्याचे दिसून येत आहे. या ठिकाणी पंकजा मुंडे यांना मदत करण्यासाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार बाळासाहेब आजबे आणि भाजपचे आमदार सुरेश धस आघाडीवर असल्याचे दिसून आले. मागच्या लोकसभेला प्रीतम मुंडे यांना याच आष्टी विधानसभा मतदारसंघातून ७० हजाराची लीड मिळाली होती आता मतदानाची टक्केवारी वाढली असल्याने या लीडमध्ये आणखी भर पडेल असे बोलले जात आहे. प्रचारामध्ये आमदार सुरेश धस आणि आमदार बाळासाहेब आजबे यांनी जोरदारपणे कामगिरी करीत पंकजा मुंडे कशा निवडून येतील यामध्ये लक्ष घातल्याचे दिसून आले होते. विधानसभा निवडणूक बाजूला ठेवून या लोकसभेमध्ये पंकजा मुंडे निवडून याव्यात अशाच पद्धतीने दोघांनी काम केले. त्यामुळे या ठिकाणची लीड आणि वाढलेली टक्केवारी याचा फायदा पंकजा मुंडे यांना निश्चितपणे मिळेल असे मानले जात आहे.

### गेवराई, माजलगाव अटीतटीत चालले मात्र आमदारांमुळे फायदा होईल..

गेवराई आणि माजलगाव तालुका हा मराठा भरून भाग म्हणून ओळखला जातो. त्यामुळे या ठिकाणी अटीतटीची लढाई झाल्याचे दिसते मात्र गेवराई मध्ये लक्ष्मण पवार हे भाजपचे आमदार आहेत शिवाय अजित पवार गटाचे नेते अमरसिंह पंडित हे सुद्धा महायुतीच्या सोबतीला आहेत, त्यामुळे याचा फायदा पंकजा मुंडे यांना होणार आहे. तिकडे माजलगाव मध्ये अजित पवार गडाचे प्रकाश सोळंके हे आमदार आहेत शिवाय मोहनराव जगताप, रमेशराव आडसकर आणि इतर भाजपचे कार्यकर्ते आणि प्रकाश सोळुंके यांच्या राष्ट्रवादीचे कार्यकर्ते यांच्यामुळे पंकजा मुंडे यांनाच फायदा होईल असे गृहीत धरले जात आहे.

### केजकर पंकजा मुंडे यांच्याच पाठीशी..

केज मतदार संघाचे प्रतिनिधित्व भाजपच्या आमदार नमिता मुंदडा या करतात. बजरंग सोनवणे हे राष्ट्रवादीचे उमेदवार केज मधूनच असल्याने त्यांचीही इथे चांगली चलती आहे मात्र मागच्या वेळच्या निवडणुकीत बजरंग सोनवणे हेच उमेदवार होते आणि त्यावेळी तिथं मुंडे यांना या मतदारसंघातून लीड मिळाली असल्याचे दिसून आले होते. विशेष म्हणजे त्यावेळी मुंदडा धनंजय मुंडे हे बजरंग सोनवणे यांच्या बाजूने प्रचार करीत होते. आता यंदा मुंदडा सोबतीला आहेत शिवाय धनंजय मुंडे हे सुद्धा महायुतीच्या सोबत असल्याने केजकर पंकजा मुंडे यांना लीड देतील असे गृहीत धरले जात आहे. याशिवाय अशीही चर्चा होत आहे की, बजरंग बप्पा सोनवणे हे कारखानदार असल्याने कोणत्या ना कोणत्या कारणावरून शेतकरी त्यांच्यावर नाराज आहेत, त्यामुळे याही ठिकाणी पंकजा मुंडे यांचे पारडे जड असल्याचे सांगण्यात येते.

### वंजारी समाजाची शांतीत क्रांती..

एकीकडे मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून या निवडणुकीत मराठा समाज अत्यंत अग्रेसिव दिसला. मराठा समाजाच्या तरुणांनी अत्यंत आक्रमकपणे प्रचार केला शिवाय पंकजा मुंडे यांनाही जागोजागी अडविण्याचा प्रयत्न झाला. दुसरीकडे मात्र वंजारी समाज यांनी अत्यंत शांतपणे प्रचार केला आणि समाजामध्ये एकी ठेवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. शांतपणे पंकजा मुंडे यांची बाजू मांडणे, त्यांची समाजाला किती गरज आहे हे समजावून सांगणे आणि येणाऱ्या निवडणुकीत आपली जबाबदारी किती महत्त्वाची आहे हे पटवून देण्यात वंजारी समाजाचे कार्यकर्ते, नेते यशस्वी ठरले. ही निवडणूक आपल्याच घरची आहे, आपल्या अस्तित्वाची आहे असे सांगताना कार्यकर्त्यांनी कोणत्याही प्रकारे आताताईपणा केला नाही. म्हणजे वंजारी समाज यांनी शांती मधून क्रांती केल्याचे दिसून आले.

### परळी एक गठ्ठा चालली, धनंजय मुंडे कामी येणार

परळी ही मुंडे यांचे बलस्थान आहे. या ठिकाणी मुंडे घराण्याशिवाय दुसरे काहीच होत नाही. मागच्या विधानसभेमध्ये पंकजा मुंडे यांचा धनंजय मुंडे यांनी पराभव केला मात्र आताच्या लोकसभेमध्ये परिस्थिती पूर्णपणे पलटली असून, स्वतः धनंजय मुंडे हे बहीण पंकजा मुंडे यांच्या सोबतीला आहेत. त्यामुळे या ठिकाणी दुहेरी ताकद एकत्र आल्याचे स्पष्टपणे दिसत असून, आता सर्वात मोठी लीड परळी मतदारसंघातून पंकजा मुंडे यांना मिळणार हे सूर्यप्रकाशा इतके स्पष्ट आहे. धनंजय यांनी पंकजा मुंडे यांच्यासाठी संपूर्ण ताकद पणाला लावली आहे. परळी मतदारसंघांमध्ये ही गेल्या वर्षीच्या तुलनेत मतदानाचा टक्का वाढला आहे आणि तो सगळा पंकजा मुंडे यांच्या बाजूने जाईल असे मानले जात आहे.

# लाचेचे आकडे कोटीत असतील तर अडकलेल्या ठेवी परत कशा मिळणार?

## एका मल्टीस्टेट प्रकरणात आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकाने केली १ कोटी लाचेची मागणी

बीड (किसान न्युज): मासाहेब जिजाऊ मल्टीस्टेट प्रकरणात आरोपी न करण्यासाठी दोघांकडून आर्थिक गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षकाने १ कोटी लाचेची मागणी केली. त्यातील ५ लाख स्वीकारताना व्यापारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकला. लाचेची मागणी १ कोटी पर्यंत आकडे असतील तर लोकांच्या अडकलेल्या ठेवी कशा परत मिळतील असा प्रश्न जनतेतून उपस्थित केला जात आहे.



बीड जिल्ह्यातील अनेक मल्टीस्टेट मध्ये अफरातफर झाल्याने कुलुप लागले आहेत. यामध्ये अनेकांची आयुष्यभराची कमाई अडकून पडल्याने अनेक ठेवीदार देशोधडीला लागले आहेत. त्यांना आता केवळ प्रशासनाकडून ठेवी परत मिळण्याची अपेक्षा आहे. परंतु बुधवारी उघडकीस आलेल्या लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईने ठेविदारांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मासाहेब जिजाऊ मल्टीस्टेट बंद पडली आहे. यामध्ये लोकांचे जवळपास दोन कोटी रुपये अडकलेले आहेत. संबंधित मल्टीस्टेटचे संचालक फरार आहेत. याप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्यात आला. तपास करताना मासाहेब » पान २ वर

# पर्स मधील दागिने अन् रोख रकमेची चोरी

## अंबाजोगाई तालुक्यातील घटना

अंबाजोगाई (किसान न्युज): ऑटो रिक्षाने प्रवास करत असतांना पर्समधील नगदी रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ६९ हजार रुपयाचा ऐवज चोरून नेल्याची घटना अंबाजोगाई तालुक्यामध्ये घडली आहे. लता लक्ष्मण भोईटे रा. लोखंडी सावरगाव (ता.अंबाजोगाई) या लोखंडी सावरगाव येथे जाण्यासाठी ऑटोरिक्षामध्ये बसल्या होत्या. प्रवासादरम्यान त्यांच्या पर्समधील रोख रक्कम ५ हजार ५०० आणि सोन्याचे दागिने ६४ हजार रुपये असा एकूण ६९ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला



आहे. या प्रकरणी लता भोईटे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अंबाजोगाई पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास अंबाजोगाई पोलीस करत आहेत.

### ढगाळ वातावरणामुळे उन्हाचा चटका कमी

बीड : मागील काही दिवसांपासून अवकाळी पाऊस होत आहे. यामुळे ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने मे महिन्यातही उन्हाचा चटका कमी झाला. परंतु उष्णता कायम असल्याने अंगातून घामाच्या धारा वाहू लागल्याने जनता पंखा, कुलरच्या हवेला बसणं पसंत करत आहेत.







# नांदूरघाट दगडफेक प्रकरणी १५० जणांवर गुन्हा दाखल

## पोलीस वेळीच गावात दाखल झाल्याने अनर्थ टळला

केज (किसान न्युज): तालुक्यातील नांदूरघाट येथे रात्री दोन गट आमनेसामने आल्याने वाद होऊन दगडफेकीची घटना घडली. यामुळे गावात तणावाची परिस्थिती आहे. वेळीच पोलीस गावात पोचल्याने मोठा अनर्थ टळला आहे. याप्रकरणी एका गटातील व्यक्तीच्या तक्रारीवरून केज पोलीस ठाण्यात १५० जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. सध्या गावात शांतता असून, पोलीस गावात तैनात आहेत. सोशल मीडियावर आक्षेपार्ह पोस्ट शेअर केल्याने दोन गटात वाद निर्माण झाला. जमावाने मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. यामध्ये एका महिलेसह तिघेजण जखमी झाल्याची घटना घडली. याप्रकरणी पाच ते सहाजण ओळखीचे इतर १०० ते १५० चा जमाव घरी एक मराठा लाख मराठा घोषणा देत जमाव घरी आला.घरात घुसून तुम्ही कमळाच्या फुलाला मतदान का केले म्हणून मारहाण करु लागले. माझी पत्नी मारु नका म्हणून सोडविण्यासाठी आली असता तीला ही मारहाण करण्यात आली. आमची आरडाओरडा ऐकून शेजारील काहीजण भांडण सोडविण्यासाठी आले असता त्यांनाही जमावाने मारहाण केली. घरावर मोठ्या प्रमाणात दगडफेक केली. यावेळी जमावाच्या हातात, लाठ्याकाठ्या, धारदार शस्त्रे होती. जमावातील काहीजण याला जिवे मारुन टाका असे ओरडत होते. या अशयाची फिर्याद राजेंद्र जनार्धन गोपाळघरे (वय ५९ वर्ष) रा.नांदूरघाट यांनी दिली. त्यावरुन संशयित आरोपी अमोल सखाराम जाधव, श्रीकांत तुकाराम जाधव, सागर तुकाराम जाधव, शंकर भानुदास जाधव, सुधीर जाधव, प्रदिप जाधव यांच्यासह अज्ञात १०० ते १५० आरोपींवर केज पोलीस ठाण्यात जिवे मारण्याचा प्रयत्न सह आदी कलमानुसार गुन्हा दाखल करण्यात आला.घटनेचा अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक राजेश पाटील हे करत आहेत.

# नारायणगडावरील ८ जून रोजी होणारी सभा रद्द!

## मनोज जरांगे यांची घोषणा

बीड (किसान न्युज): मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा ४ जून पासून आंतरवाली सराटी येथे उपोषण सुरू करणार असल्याची घोषणा केली. तसेच नारायण गडावर ८ जून सभा होणार होती. पण बीड जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात दुष्काळाचे सावट आहे.पाणी उपलब्ध नसल्याने आणि उन्हाची तीव्रता देखील जास्त आहे. त्यामुळे एकत्र येणाऱ्या मराठा बांधवांची गैरसोय नको, यासाठी नारायण गडावरील सभा रद्द करण्यात आली आहे. अशी माहिती मनोज जरांगे पाटील यांनी दिली. पुढील सभा कधी होणार? याचा निर्णय अद्याप झालेला नाही. मात्र, तुर्तास आठ जून रोजीची सभा रद्द करण्यात आली आहे.



मराठा आंदोलनाच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांनी सगेसोयरेची मागणी पुन्हा एकदा करत असल्याचे सांगितले जात आहे. या दरम्यान मनोज जरांगे पाटील यांनी भाजपवर देखील » पान २ वर